I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर **P.S. (पोलीस ठाणे):** सावली **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0048 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/02/2025 05:46 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्हयाची घटना):**

1 **Day (दिवस):** मंगळवार **Date from (दिनांक पासून):** 25/02/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 25/02/2025

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 15:00 तास **Time To (वेळेपर्यंत):** 20:45 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 25/02/2025 **Time (वेळ):** 22:30 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 008 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 26/02/2025 05:46 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S.(पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 17 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** श्री दत्त किराणा स्टोअर्स समोर, लोंढोली,सावली

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

6.

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** समीर धनवान बोदलकर

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1996

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वार्ड क्र 2, लोंढोली, सावली, सावली, चंद्रपुर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | वार्ड क्र 2, लोंढोली, सावली, सावली, चंद्रपुर, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9309715803

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | चंद्रशेखर केशव रामटेके | राजु | | 1. बबन मुनगंटीवार यांचे घरी,Town/Village (शहर / गाव): किरायाणे,लोंढोली,Tehsil (तहसील): सावली,Police Station (पोलीस ठाणे): सावली,District (जिल्हा): चंद्रपुर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

तक्रारदारने तक्रार देता लागलीच

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | MI रेड मी कंपनीचा काळ्या रंगाचा मोबाईल फोन | 2,000.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 200 रु. चे 50 नोटा एकुण 10000 | 10,000.00 |
| 3 | इतर | यंत्र–उपकरण/उपसाधन | सॅनडिक्स कंपनीचे 32 GB क्षमतेचे 2 मेमोरीकार्ड | .00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 12,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद

दिनांक:- 26/02/2025

ठिकाण:- सावली

मी समीर धनवान बोदलकर, वय 29 वर्ष, व्यवसाय - शेती, रा. वार्ड 02, लोंढोली, ता. सावली, जि. चंद्रपूर येथे आपले आई वडीलासह राहातो. मी राष्ट्रपिता महात्मा गांधी महाविद्यालय, सावली येथे बि.ए. चे शिक्षण पुर्ण केले आहे. दिनांक 25/02/2025 रोजी मला माझे लोंढोली गावचे ग्रामसेवक हे पैशाची मागणी करीत असल्याने त्यांचे विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपुर येथे तक्रार द्यायची होती. त्यामुळे दुपारी अंदाजे 03:00 वाजता मी माझ्या मोबाईलमध्ये सेव्ह असलेला अँन्टी करप्शन चंद्रपूर च्या टेलीफोन क्रमांक 917127-250251 या क्रमांकावर माझा मोबाईल क्रमांक 9309715803 या क्रमांकावरून फोन लावला असता समोरून एक मॅडम बोलल्या त्यांनी अँन्टी करप्शन ब्युरो चंद्रपूर येथून मंजुषा भोसले बोलत आहे असे सांगीतल्याने मी त्यांना मला एक कंम्प्लेट द्यायची आहे असे सांगीतले. तेव्हा भोसले मॅडम यांनी मला काय कंम्लेंट आहे सांगा असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना सांगीतले की, माझे वडीलांना घरकुल मंजुर आहे. आणि त्याकरीता आमच्या गावचा ग्रामसेवक आम्हाला पैसे मागत आहे, असे सांगीतले. तेव्हा भोसले मॅडम यांनी मला ‘आमचे कार्यालयाला येउन तक्रार देण्यास सांगीतले’. तेव्हा मी त्यांना सांगीतले की, 1 वर्षा पुर्वी माझा मोठा अपघात झाला असल्याने मी जास्त दुरपर्यंत प्रवास करू शकत नाही. असे सांगुन त्यांनाच लोंढोली येथे येण्याची विनंती केली. त्यावर भोसले मॅडम यांनी ‘ठिक आहे, आम्ही येतो तिकडे’ असे म्हणाल्या आणी माझा मोबाईल नंबर घेउन फोन ठेवला. त्यानंतर 03:17 मिनीटांनी अँन्टी करप्शनच्या कार्यालयातुन परत मला फोन आला व भोसले मॅडम यांनी आम्ही तिकडेच येत आहोत, जवळपास आलो की, तुला फोन करून सांगतो. असे सांगीतले. त्यानंतर सायंकाळी अंदाजे 05:45 वाजता चे सुमारास भोसले मॅडम यांचा माझे मोबाईलवर फोन आला आणी लोंढोली गावाचे अगोदर आडमार्गे एका सुरक्षीत ठिकाणी कामासंबंधी सर्व कागदपत्रे घेउन थांबुन राहण्याचे सुचना दिल्या. त्यावरून मी माझे होंडा कंपनीची शाईन दुचाकी वाहन क्र. एम.एच.34-बी.एन. 6951 नी लोंढोली ते सावली जाणा-या रोडवर एका आडमार्गे जाणा-या रोडवर येउन हजर राहीलो. काही वेळानंतर 06:20 वाजता चे दरम्याने माझेजवळ एक पांढ-या रंगाचे वाहान येउन उभे राहीले. मी सदर वाहणाजवळ गेलो असता भोसले मॅडम यांनी आपला परीचय दिला. तसेच त्यांचे वाहनातील कार्यालयीन स्टाफ आणि त्यांचे सोबत असलेले दोन पंचाचा परिचय दिला. त्यानंतर मला सविस्तर विचारणा करून माझ्या स्वहस्ताक्षरात तक्रार नोंदविली. तेव्हा मी मंजुषा भोसले, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपुर यांचे समक्ष एका लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार दिली ती खालीलप्रमाणे आहे.

‘‘सविनय विनंती याप्रमाणे आहे की, मी वर नमुद पत्त्यावर आई-वडीलांसह राहतो व शेतीचा व्यवसाय करतो. सोबतच सावली येथील राष्ट्रपिता महात्मा गांधी, महाविद्यालय सावली येथे बी.ए.

च्या अंतीम वर्षाला शिक्षण घेत आहे. माझे वडील श्री. धनवान गोपाळा बोदलकर वय 50 वर्ष हे सुध्दा शेतीचा व्यवसाय करतात. माझें वडीलांचे 4 थी पर्यतचे शिक्षण झालेले आहे. त्यामुळे त्यांची सर्व शासकीय कार्यालयातील आणि बाहेरील इतर सर्व कामे मी करीत असतो. मागील वर्षी माझे वडील श्री. धनवान गोपाळा बोदलकर यांना पंतप्रधान आवास योजने अंतर्गत घरकुल मंजुर होण्याकरिता त्यांचे नाव ग्राम पंचायत लोढोंली येथे दिले होते. त्यामध्ये गावातील सर्व बहुतांश लोकांनी त्यांची नावे दिलेली होती. मागील वर्षी ग्राम पंचायत लोंढोली कडून 'ड' यादी प्रसिध्द करण्यात आली होती त्यामध्ये एकूण 57 लोकांना घरकुल मंजुर करण्यात आले होते. ज्यामध्ये माझे वडील यांचेसुध्दा नाव होते. त्यामुळे घरकुल मंजुरीकरीता मी ग्राम पंचायत लोढोंली येथील ग्रामसेवक श्री. चंद्रशेखर रामटेके यांचेकडे वेळोवळी पाठपुरावा करित होतो. माझे वडीलांचे सावली येथील ग्रामीण बॅक, आणि आय.डी.बी.आय बॅकेत तसेच लोंढोली येथील सी.डी.सी.सी. बॅकेत असे एकूण तीन बॅकेत खाते असून तिन्ही बॅक खात्याला माझा मोबाईल क्रमांक जोडणी केलेला आहे. ज्यामुळे मला वडीलांचे बॅक खात्यामध्ये झालेले ट्रान्जेक्शन एस.एम.एस. व्दारे मला माहित होतात.

दिनांक 23/02/2025 रोजी संध्याकाळी 04/30 वा. ग्राम पंचायत लोंढोली येथे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल मंजुर झालेल्या लोकांकरिता महाराष्ट्र शासनाकडून कार्यक्रामाचे आयोजन करण्यात आलेले होते. ज्याचे ऑनलाईन प्रक्षेपन होणार असल्याने मी पण तो कार्यक्रम पाहण्यासाठी ग्राम पंचायत लोंढोली येथे 04/30 वा. गेलो होतो. सदर दिवशी लाभार्थांचे खात्यामध्ये रक्कम जमा होणार होती. कार्यक्रम झाल्यानंतर मला शासनाकडून 15,000/-रू. जमा करण्यात आल्याबाबत माझे वरील मोबाईलवर एस.एम.एस. प्राप्त झाला होता. त्यानंतर मी घराकडे एकटा परत येत असतांना साधारणत: 06/15 वा. दरम्यान ग्रामसेवक श्री. चंद्रशेखर रामटेके हे माझेजवळ येवून मला म्हणाले की, ''झाले का खात्यामध्ये पैसे जमा''असे विचारले त्यावर मी त्यांना माझे मोबाईलवर आलेला एस.एम.एस. दाखविला आणि ''पैसे जमा झाले पण कोणत्या खात्यावर जमा झाले हे माहिती नाही'' असे म्हणालो. तेव्हा ग्रामसेवक रामटेके म्हणाले की, ''आता तुला दुसरा टप्पा मंजुर करून घ्यायचा असेल तर माझेकरिता 20,000/-रू. दयावे लागतील''असे म्हणाले. त्यावर मी त्यांना ठिक आहे असे म्हणून तेथून घराकडे निघन आलो. त्या दिवशी संध्याकाळी 06/30 वा. चे दरम्यान माझे मोबाईलवर ग्रामीण बॅक सावली शाखा येथील वडीलांचे खात्यावर 15,000/-रू. चा पहिला टप्पा जमा झाला असल्याचा एस.एम.एस. आला.

दिनांक 24/02/2025 रोजी रात्रो 09/00वा. चे दरम्यान मी गावातील बळीराम चौधरी यांचे श्री दत्त किराणा स्टोअर्स येथे गेलो असता तिथे ग्रामसेवक चंद्रशेखर रामटेके हे मला भेटले आणि मला थोडे बाजुला घेवून जावून म्हणाले की, ''आता कधी करशील माझे काम''म्हणाले त्यावर मी त्यांना ''माझे घराचे काम सुरू आहे. चार पाच दिवसांनी पाहतो''असे म्हणाले त्यावर ग्रामसेवक रामटेके यांना ''ठिक आहे लवकर करून घेशील''म्हणाले. त्यानंतर मी तिथून माझे घराकडे निघून आलो.

माझी ग्रामसेवक चंद्रशेखर रामटेके यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी दिनांक 25/02/2025 रोजी अंदाजे दुपारी 03/00 वा. दरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर कार्यालयाचे 07172-250251 या क्रमांकावर फोन लावून श्रीमती भोसले मॅडम यांना सर्व हकिकत

सांगितली. त्यावर भोसले मॅडम यांनी मला चंद्रपूर येथे कार्यालयात तक्रार नोंदविण्याकरिता येण्यास सांगितले. त्यावर मी त्यांना सांगितले मी मागच्या वर्षी माझा मोठा अपघात झाल्यामुळे मी जास्त दुर पर्यंत प्रवास करू शकत नाही त्यामुळे त्यांना लोंढोली येथे येण्याची विंनती केली. त्यावरून श्रीमती भोसले मॅडम यांनी आज दिनांक 25/02/2025 रोजी मला मौजा लोंढोली गावाचे आधी एका सुरक्षित स्थळी घरकुलचे कामासंबंधाने सर्व कागदपत्रे घेवुन हजर राहणेबाबत सुचना दिली. त्यावरून मी माझे दुचाकी वाहनाने लोंढोली ते सावली जाणारे रोडवर एका आडमार्गे जाणारे रोडवर येऊन हजर राहिलो व भोसले मॅडम यांना भेटून माझी तक्रार सांगितली.

माझा गैरअर्जदार चंद्रशेखर रामटेके ग्रामसेवक ग्राम पंचायत लोढोली यांचेशी कोणताही आर्थिक व उसनवारी व्यवहार नाही. गैरअर्जदाराने मागणी केलेली रक्कम मी माझे वैयक्तिक बचतीतुन जमा केलेले 20,000/ रू लाच रक्कम म्हणुन वापरण्याकरीता देत आहे. तरी माझे तक्रारीवरुन पंतप्रधान आवास योजने अंतर्गत माझे वडीलांचे नावे मंजुर झालेल्या घरकुलचा 70,000/-रू. चा दुसरा टप्पा मंजुर करण्याचे कामाकरीता 20,000/- रू. ची लाच मागणारे गैरअर्जदार श्री. चंद्रशेखर रामटेके ग्रामसेवक ग्राम पंचायत लोंढोली यांचेविरुध्द कार्यवाही होणेस विंनती आहे.''याप्रकारची लेखी तक्रार दिली.

त्यानंतर श्रीमती भोसले मॅडम यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोलीस अंमलदार नरेशकुमार नन्नावरे यांनी व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहीती मला व पंचांना दिली. त्यानंतर श्रीमती भोसले मॅडम यांनी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर श्रीमती भोसले मॅडम यांनी मी जमा केलेली सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी रक्कम रू. 20,000/- (रू. 200/- दराच्या 100 चलनी नोटा) घेतल्या आणि सदर नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. सदर नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म समजावले व लाचेच्या रकमेस अँथ्रॅसिन पावडर लावून शासकीय वाहनातच प्रात्यक्षिक करून दाखविले. (याबाबत केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा क्र. 1 श्रीमती भोसले मॅडम यांनी तयार केला.)

त्यानंतर भोसले मॅडम यांनी मला ग्रामसेवक चंद्रशेखर रामटेके हे यावेळी कुठ भेटतील अशी विचारणा केली असता मी त्यांना सांगीतले की, चंद्रशेखर रामटेके हे नेहमीच संध्याकाळच्या वेळी लोंढोली गावातील बळीराम चौधरी यांचे श्री. दत्त किराणा स्टोर येथे राहतात, असे सांगीतले. त्यानंतर भोसले मॅडम यांनी पंचासमक्ष ग्रामसेवक चंद्रशेखर रामटेके, ग्रामपंचायत लोंढोली, ता. सावली, जि. चंद्रपूर, यांची लाच मागणी संबंधाने पडताळणी कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगुन भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी पडताळणीपुर्व अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली.

त्यांनतर सायंकाळी 19/02 वा. दरम्यान भोसले मॅडम यांच्या सुचनेवरुन पोलीस अंमलदार नरेशकुमार नन्नावरे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांनी त्यांचे आवाजात पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हॉईस रेकॉर्डर काळ्या

धाग्याच्या सहाय्याने माझ्या छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून माझे दुचाकी वाहन क्र. एम.एच.34-बी.एन. 6951 नी पंच क्र. 01 यांचेसह ग्रामसेवक चंद्रशेखर रामटेके यांचेकडे पडताळणी करीता 19/03 पाठविले. मी व पंच क्र. 1 सोबत चंद्रशेखर रामटेके हे नेहमी राहात असलेल्या लोंढोली गावातील बळीराम चौधरी यांचे श्री. दत्त किराणा स्टोर येथे गेलो असता चंद्रशेखर रामटेके हे मला भेटले. पडताळणी दरम्यान चंद्रशेखर रामटेके यांनी मला ''किती काढलास एटीएम मधून, कितीक आणला आता, आता मी काय बोलु आपल्या ईच्छेने दे. कारण माहित आहे का संरपंचाले दया लागते. दुस-या बिलावर देजो. तीन तारखेला टाकाले लावून देतो, सत्तर ची. हं. ' असे म्हणुन माझे वडीलांचे नावे मंजुर झालेल्या घरकूलचा 70,000/- रूपये चा दुसरा टप्पा मंजुर करण्याचे कामाकरीता 20,000/- रू. ची मागणी करून तडजोडीअंती 10,000/- रू. लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. तसेच उर्वरीत 10,000/-रू. दुस-या बिलावर स्विकारण्याची तयारी दर्शवली आहे. त्यानंतर मी ग्रामसेवक चंद्रशेखर रामटेके यांना सोबत असलेल्या पंचाला ''घाट दाखवू येतो जस्ट''असे म्हणून मी पंचासह दुचाकी वाहनाने भोसले मॅडम, त्यांचे पथकासह थांबून असलेल्या ठिकाणी परत आलो. लाचरक्कम मागणीबाबतची पडताळणी कार्यवाही करुन परत आल्याबाबत पंच क्र. 01 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर वा. 19/24 वा. बंद करण्यात आले. त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी पडताळणी करून आल्यानंतर अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. (सिसिटीएनएस प्रणालीमध्ये शब्द मर्यादा असल्यामुळे यापुढील सविस्तर फिर्याद ही मुळ फिर्यादी प्रमाणे आहे)

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** pradip vasant pullarwar (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

**on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** pradip vasant pullarwar

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):**

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल् या/पाहिलेल् या) शारीरिक वैशिष् टये, व् यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन् मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच् या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1981 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व् यंग वैशिष् टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच् य सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल् याच खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त् यापेक्षा अधिक तपशील दिल् यास फक् त यातील रकान् यांची नोंद घेतली जाईल)**